# राशिभविष्य - ऑगस्ट, २०१४.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================

**(१) मेष** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ प्रतिकुलअसल्याचाच अनुभव येईल. सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना, नोकरीत होणारा त्रास , नियोजित कार्यात होणारी दिरंगाई अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. त्यामु ळेच शारीरिक अनारोग्यही होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक वाद, इतर समस्या आणि उत्तरार्धात आप्तेष्ट जणांकडून होणारा त्रास यांमुळे कौटुंबिक सुख समाधान लाभण्याची शक्यता कमी आहे. तसेच प्रिय जानापासून दुरावा निर्माण झाल्यामुळे व मुलांपैकी कोणाच्या अनारोग्यामुळे वा अन्य समस्येमुळे अस्वस्थ व्हाल. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे परिस्थिती आटोक्यात राहील व काही लाभदायक घटनाही घडतील. स्थावर खरेदी-विक्रीची कामे असतील तर ती अपेक्षेनुसार पार पडतील. शेतीवाडी असेल तर त्यापासून अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. पण जीवनसाथीचे वा स्वत:चे अनारोग्य, दोघांतील वाद, मतभेद यांमुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभण्याची शक्यता दिसत नाही. जपा. कुमार्गी मित्रांपासून धोका संभवतो. जपा. शत्रुत्व निर्माण होणेही संभवते. जपा. या राशीच्या ज्या मंडळीचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असेल त्यांना अशा संबंधामुळे अर्थलाभ होणे संभवते. मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून आचरण केल्यास खूपच सुखाचे होईल.

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. त्यामुळे जे काय साधावयाचे ते महिन्याच्या

पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याच्या पूर्वार्धातनोकरीत विविध प्रकारचे लाभ होतीलसे दिसते. या राशीच्या लेखक मंडळीचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होईल. प्रवासाचे योग येतील. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्रीग्राहक ांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण भावंडापैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. कोणाशीही शत्रुत्व निर्माण होणार नाही याची काळजी घ्या. दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. तसेच द्रव पदार्थांचे व्यापारी, मनोविकार तज्ञयांना आणि चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना, यांत्रिक तांत्रिक नोकरी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र अनुकुल काळाचा लाभ घेण्यासाठी सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम असले पाहिजे. कारण उष्णता व वात विकारांचा त्रास होणे संभवते. शारीरिक इजा होणे, ताप येणे, फोड येणे, तसेच पोट बिघडणे, रक्तविकार बळावणे, हृदयविकार बळावणे अशापैकी आजार होणे संभवते. जपा. घरात चोरी होणे संभवते. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना कौटुंबिक सुख, गृहसौख्य व संतातीसुख या दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. परंतु गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून शुभ व लाभदायक घटना घडतील. त्यामुळे परिस्थिती आटोक्यात राहील. महिन्याच्या उत्तरार्धात खूपच मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या नोकरदार मंडळीना बढती, अधिकार पद, मानाचे स्थान, पगारवाढ अशा प्रकारचे लाभ होणे संभवते. परंतु संततीपैकी कोणाचे मनाविरुद्ध आचरण, कोणाचे आजारपण, कोणाचे अभ्यासाकडे दुर्लक्ष अशापैकी कारणांनी संतती

सुखात व गृहसौख्यात बाधा येईलसे दिसते. या राशीच्या विद्‌यार्थ्यांच्याशैक्षणिक प्रगतीत अडथळे येण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या युवकांनी सध्या आहे तो नोकरी-व्यवसाय बदलण्याचा विचारही करू नये. नुकसान होणे संभवते. मीन या गुरु ग्रहाच्या मालकीच्या राशीत हर्षल व धनस्थानी उच्च राशीत गुरु अशा शुभ योगामुळे व्यवसायात अनपेक्षित लाभ व भरभराट होणे संभवते. मुत्सद्दी , राजकारणी मंडळीना तसेच चिकित्सक , उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काळ यशदायक होईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्‌वारे मन:शांती लाभेल. काही मंडळीना परदेशगमनाचे योग येतील. कुलदैवताची उपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. केवळ गुरु - शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. केवळ बौद्धिक कार्यक्षेत्र व शास्त्रीय संशोधन आणि गूढ संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांनाप्रगती करता येणे व यश मिळविणे शक्य होईल. तसेच या राशीच्या लेखक मंडळीचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होणे संभवते. या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना दूरच्या प्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग येतील. रवि - मंगळ - शनि हे तिन्ही दादा ग्रह प्रतिकुल असल्याने कौटुंबिक सुख व गृहसौख्य तसेच अपेक्षित संततिसुख मिळणे अशक्य होईलसे दिसते. पण सतत होणारा मनस्ताप आणि नियोजित कार्यातील अडथळे यांमुळे उष्णता भडकून उष्णतेचे विकार त्रस्त करतील. काही मंडळीना नेत्रविकार त्रस्त करतील. सहनशील बनून व मनावर ताबा ठेवून आचरण करा. नपेक्षा रक्तदाब वाढेल. हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. राहूमुळे बंधू सुखात बाधा येणे शक्य आहे. जपा. या राशीच्या काहींना स्थावर समस्येचा तर काहींना राहत्या जागेच्या

समस्येचा मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. पाण्यापासून धोका संभवतो. जपा. तसेच विष भयही संभवते. जपा. श्रद्धेने नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा.

(५) **सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याची एकूण ग्रहस्थिती प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. रवि-बुध, हर्षल -नेपच्यून, राहू-केतू हे ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून शनि-मंगळ काही प्रमाणात अनुकुल होतील. महिन्याच्या पूर्वार्धात मनाविरुद्ध घटना घडतील व असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. त्यामुळेमन अस्वस्थ राहील व नैराश्य येईल. महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. थकवा जाणवेल. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. काहींच्या कुटुंबात कलह निर्माण होतील. व्यय स्थानी असलेला उच्च राशीतील गुरु अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शांती देईल; तर सामाजिक कार्यात कार्यरत असणारांच्या कार्यात अपेक्षेपेक्षा अधिक प्रगती होण्यास हातभार लावील. शुक्र ग्रह मधून मधून मनोनुकुल घटना घडवील व त्यामुळे दिलासा मिळेल. तसेच या राशीच्या युवकांनाउत्तम नोकरी किंवा अपेक्षित असे नवे कार्यक्षेत्रमिळू शकेल. त्यातून महतत्वाकांक्षा वाढेल. पण शनी-मंगळ युतीमुळे इजा, दुखापत होणे संभवते. तसेच भावंडविषयक चिंता त्रस्त कारीलसे दिसते. सतत सावधानतेने आचरण करा. कारण अपघात भय आहे. वाद, मतभेद टाळलेत तर वैवाहिक जीवनात सुखसमाधान मिळू शकेल. श्रद्धेने शिवोपासना करा.

(६) **कन्या** - या राशीच्या मंडळीचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा केवळ

तीन महिन्यांचा काळ शिल्लक राहिला आहे. तेव्हा मनावर संयम ठेवून व सहनशील बनून उर्वरित काळ व्यतीत केलात तर फारसा मनस्ताप सहन करावा लागणार नाही. मनस्ताप कराल तर शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. डोळे, मान, घसा यांचे आजार होणे संभवते. जपा. कौटुंबिक सुखात बाधा येणार नाही याची काळजी घ्या. रवि-बुध-गुरु हे तीनही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात नोकरी-व्यवसायास अनुकुल व लाभदायक होणार असल्याने जे काय साधावयाचे ते त्या काळात साधून घेण्याचा प्रयत्न करा. नंतरच्या प्रतिकुल काळात मनस्तापच सहन करावा लागेल. मात्र कलाकार मंडळीना महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असेल व उत्तरार्धलाभदायक होईल. ज्यांचा भागीदारीत व्यापार - व्यवसाय असेल त्यांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वा लहरी, विक्षिप्त आचरणामुळे किंवा मतभेदांमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात केवळ शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काल्पनिक चिंता करू नका. या राशीच्याविद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल होईल. कुलदेवतेची उपासना करा.

**(७) तुळा -** भावनाशील मन व अहंकारी स्वभाव यामुळेच या राशीच्या मंडळीना असह्य मनस्ताप सहन करावा लागून शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. जपा. अकारण श्रम , दगदग करू नका. जिभेला लगाम घाला. अकारण अति विचार करू नका. डोकेदुखीचा त्रास होईल. काही मंडळीना मेंदूविकारही होणे संभवते. जपा. आध्यात्मिकउपासनेद्वारे मन स्थिर व शांत राखणे शक्य होईल. उच्च बौद्धिक , शैक्षणिक , शास्त्रीयव गूढ संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळप्रगतिकारक

व यशदायक होईल. तसेच या राशीच्या नोकरदार मंडळीनाही संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. मात्र कलाक्षेत्रातील मंडळीना अडचणी व त्रास सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात काहीही कारणाने बाधा येणे संभवते. जपा. पण याच राहूमुळे या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना परदेशगमनाची संधी मिळणेही संभवते. विशेष करून कलाक्षेत्रातील विद्यार्थ्यांनाया महिन्याचा पूर्वार्ध अनुकुल व प्रगतिकारक होईल. इतरांना संपूर्ण महिन्याचा काळ शैक्षणिक प्रगतीस अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मना:शांती लाभेल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीना या संपूर्ण महिन्याच्या काळात या राशीच्या व्ययस्थानी असलेले शनिमंगळ हे शत्रू ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धातचप्रतिकुलअसेल व नंतर नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकूल होईल. या काळात सतत मनाविरुद्ध घटना घडत जातील व त्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. जपा. आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करा. कोणाच्याही आर्थिक जबाबदाऱ्या स्वीकारू नका. कागदपत्र न वाचता अंध विश्वासाने त्यावर स्वाक्षरी करू नका. गैरसमजूत होणार नाही याची काळजी घ्या. या राशीच्या काही मंडळीना जुन्या दबलेल्या प्रकरणांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून सतत आचरण केलेत तरच सुखाचे होईल व अनारोग्य होणे टळू शकेल व गृहसौख्य लाभू शकेल. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या नोकरदार मंडळीना तसेच बौद्धिक , शैक्षणिक , शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. पण

वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह कटाक्षाने टाळाच. काही मंडळीना प्रवासाचे योग येतील. उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती व मन:शांती साधणे शक्य होईल. मात्र संततीबाबत एखादी चिंता त्रस ्त कारीलसे दिसते. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(९) धनु** - सध्या या राशीच्या मंडळीचे मन अतिशय भावनाशील झाले असण्य ाचीशक्यता जाणवते. असे असेल तर त्यांनी मन:शक्ती प्राप्त करण्यासाठी आध्यात्मिक उपासनेचा अवलंब करावा. रवि ग्रह पूर्णपणे व बुध ग्रह काही प्रमाणात प्रतिकुल असल्यामुळे मनस्ताप, भांडणे, नोकरीत वरिष्ठांशी मतभेद , स्वत:चे व कुटुंबियांचे आजारपण अशापैकी कारणांनी सुखसमाधान लाभणे अशक्य होईल. जपा. तसेच सुखस्थानी असलेल्या हर्षलमुळे घरात कोणाशी पटणार नाही व त्यामुळे गृहसौख्यही लाभणार नाही. जपा. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या शनि-मंगळामुळे काही अनुकुल घटना घडणार असल्या तरी ते दोन्ही ग्रह संततिसुखात बाधा निर्माण करतीलसे ेदिसते म्हणून मनावर ताबा ठेवा, सहनशील व्हा. तरच गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे प्राप्त होणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आन ंदउपभोगू शकाल. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या ाकाहीमंडळीना भूमिलाभ तर काहीना धनलाभ होणे संभवते. जन्मकुंडलीत योग असेल तर काहीना अचानक धनलाभ वा वारसाहक्काने धनलाभ होणेही संभवते. कर्तृत्ववान नोकरदार मंडळीना अधिकारपद मिळणेही शक्य दिसते. काहीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होईल. गुरुंकृपेने तरून जाल.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ अनारोग्यकारक असल्याचाच अनुभव येईल. तसेच आर्थिक समस्या, जीवनसाथीशी मतभेद, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यत ा दिसते. जपा. या राशीच्या काही मंडळीना पोटविकाराचा किंवा मूत्राशय विकाराचा आजार होण्याची शक्यता जाणवते. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथी व संततीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल व वरिष्ठाच्या जाचास तोंड द्यावे लागेल. य ाराशीच्या युवकांना नवीन असे काहीतरी करण्याची उर्मी येईल. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता जाणवते. महिन्याच्या उत्तरार्धात यांत्रिक तांत्रिक व्यवसाय, लोखंड, कोळसा व्यापारी, औषध विक्रेते यांना आणि चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे या राशीच्या विवाहेच्छू वधूवरांचे विवाह ठरतील. नवे प्रेमसंबंध वा स्नेहसंबंध निर्मा ण होतील. काहींना परदेश प्रवासाचे तर काहीना धनलाभाचे योग येतील. आध्यात्मिक उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन अतिशय कोमल झाले असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे मानसिक संवेदना अति शीघ्र होत असल्या पाहिजेत. पण बुद्धी अत्‍यंतअस्थिर झाली असेल तर अविचाराने खर्च होणे संभवते. त्यामुळे आर्थिक चिंता होणे संभवते. जपा. तसेच मनावर ताबा ठेवून व जिभेला लगाम घालून आचरण केलेत तर मनस्ताप न होता सर्व काही सुखाचेच होईल. नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या

महिन्याचा पूर्वार्धच अनुकूल व लाभदायक होईल. आरोग्यही उत्तम राहील. त्यामुळे जे काही साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करा. पण वाममार्ग धन मिळणे सहज शक्य असले तरी तो मोह टाळाच. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थिती निर्माण झाल्यास तिला तोंड देण्यातच काळ व्यतीत होईल व अनारोग्याला सामोरे जावे लागेल. काही मंडळीना पोटविकाराचा तर काहीना मूत्राशयविकाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. कोर्ट प्रकरणे असतील तर ती शक्यतो सामोपचाराने मिटवा. जीवनसाथीशी वाद, मतभेद, भांडणे होणार नाहीत याची काळजी घेतलीत तर अनारोग्याचा फारसा त्रास होणार नाही व नैराश्यही येणार नाही. प्रवासाचे योग येतील; पण प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. श्रीहनुमान उपासना करा.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव अत्यंत चंचल, लहरी, अस्थिर असा झाला असण्याची शक्यता जाणवते. तसेच मानसिक स्थिती संततिविषयक चिंतेने नोकरीत वरिष्ठाच्या त्रासाने किंवा प्रिय जनाच्या दूरत्वामुळे नैराश्यपूर्ण झाली असावी, असे वाटते. शिवाय काही मंडळीना उष्णताविकाराचा त्रास तर काहींना वातविकाराचा असह्य त्राससहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसे असेल तर शिवोपासनेमुळे मन:शांती लाभेल व दिलासा मिळेल. शुभ ग्रह गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. शेती व्यवसाय असेल तर तो लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायात मनोनुकुल घटना घडतील व शारीरिक-मानसिक आरोग्य सुधारेल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना व गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल व यशदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे

काहीही कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. सतत सावधानतेने आचरण करा. जल भय किंवा वीजभ्य आहे. श्रद्धा असेल तर दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा.

=====oooooOooooo=====